लोकमत दि 12/03/2023

# दोन पिस्टल, काडतुसासह चार जणांना पकडले

## दरोड्याच्या तयारीत असताना पोलिसांची धाड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** दोन देशी कट्टे, १७ जिवंत काडतुसे, दोन खंजर, मिरची पावडर, दोरी व दोन दुचाकी आदी साहित्यासह दरोड्याच्या तयारीत असलेल्या सहापैकी चार आरोपींना नांदेड ग्रामीण पोलिसांनी जेरबंद केले. ही कारवाई ११ मार्च रोजी पहाटे विष्णुपुरी भागातील ग्रामीण तंत्रनिकेतन ते असदवन-वाघाळा जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस असलेल्या गुरुकुल इंग्लिश स्कूल पाटीजवळ करण्यात आली आहे. यावेळी दोघे जण मात्र अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

पोनि. अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. राजेश डाकेवाड, प्रमोद कऱ्हाळे, प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, विक्रम वाकोडे, चंद्रकांत स्वामी, विश्वनाथ पवार व संतोष बेलूरोड १० मार्च रोजी रात्री साडेबारादरम्यान पेट्रोलिंग करीत होते. यावेळी गुप्त बातमीदाराने रात्री एक वाजेच्या सुमारास चार ते पाच चोरटे विष्णुपुरी परिसरातील ग्रामीण तंत्रनिकेतन कॉलेज ते वाघाळा रस्त्याच्या बाजूस अंधारात दबा धरून थांबले आहेत अशी माहिती दिली. त्यानंतर पथकाने गुरुकुल इंग्लिश स्कूल पाटीजवळ सापळा रचला. पोलिसांना पाहताच सहा आरोपी पळून जाण्याच्या प्रयत्नात होते. चार आरोपींना पकडून झडती घेतली असता, दरोडा टाकण्याचे साहित्य मिळून आले. कमलेश पाटील याच्या ताब्यात देशी बनावटीची एक पिस्टल, मोबाइल, तर आकाश ठाकूर याच्या जवळ एक देशी कट्टा, बारा बोअर बंदुकीचे १७ जिवंत काडतुसे, तेजपालसिंग ऊर्फ तेजा चहल, देवीदास माटे यांच्याकडे खंजर आढळून आले. घटनास्थळावरील एमएच-२६, बीएल-१०५४ व अन्य एक क्रमांक नसलेली मोटारसायकल जप्त केली.

### जुना कौठा भागातील गुन्हेगारांची टोळी

- पोलिसांनी चार जणांना पकडले असून त्यामध्ये कमलेश ऊर्फ अशू पाटील, बालाजी लिंबापुरे (रा. गॅस गोडाऊनजवळ, वसरणी), आकाश जीवनसिंह ठाकूर (रा. बसवेश्वरनगर, कौठा), तेजपालसिंग ऊर्फ तेजा कुलवंतसिंग चहल (रा. जुना कौठा) व देवीदास पिराजी माटे (भोई गल्ली, वसमत ह. मु. अबचलनगर, गोविंद बाग, नांदेड) यांचा समावेश होता.